MHRG190001302024

:: विशेष दरखास्त क्र.११/२०२४ मधील निशाणी क्र.११ खालील आदेश ::

प्रस्तुत दरखास्तमधील दरखास्त अर्जदार/धनकोतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१, नियम ११(१), ३० प्रमाणे दरखास्त सामनेवाला/ऋणको क्र.१ ते ३ यांना अटकेचे वॉरन्ट काढण्यासाठी तसेच स्थावर व जंगम मिळकत जप्तीकरिता आदेशित करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्ज व अर्जाला दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. केस फाईलची पडताळणी केली. प्रकरणाचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाला/ऋणको क्र.३ यांनी त्यांचे म्हणण्यानुसार मा.अधिक्षक अभियंता उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा ठाणे आणि विशेष भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महाड यांना पत्रव्यवहार केलेला आहे. सामनेवाला क्र.३ यांनी पतपत्र अनुदान मागणी करिता कार्यवाही चालु असल्यामुळे त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई करु नये व जप्ती वॉरन्ट काढु नये अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन करता निशाणी क्र.२० वरील आदेशाप्रमाणे अर्जदार/धनको यांनी रक्कम मिळणेसाठी केलेला अर्ज दिनांक

१६.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजुर करण्यात आलेला असुन अर्जदार/धनको यांना जमा रक्कमेपैकी ७५ टक्के रक्कम व्याजासहीत अदा करणेबाबत आणि उर्वरित २५ टक्के रक्कम पाच वर्षाकरिता राष्ट्रीयीकृत बॅकेमध्ये मुदत ठेवीमध्ये गुतंविण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

५. वरील सर्व बाबींची पुर्तता झाल्याने तसेच अर्जदार यांनीदेखील निशाणी क्र.२० वरील आदेशाप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम स्विकारलेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जातील विनंती नामंजुर करण्यात येत आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: <u>आदेश</u> ::

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.09 10:58:10 +0530

महाड
दिनांकः०८.०१.२०२६

(श्रीमती एच.आर.जाधव)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
महाड.